# MAHARASHTRA FENCING ASSOCIATION

**Affiliated to :** • Fencing Federation of India
• Maharashtra Olympic Association
• Maharashtra State Sports Council

# अहवाल

# २०१४-१५

**वार्षिक सर्वसाधारण सभा**

**दि.२० मे २०१५, औरंगाबाद**

# <u>सभेची सुचना</u>

महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा दि.१९/०५/२०१५ रोजी विभागीय क्रीडा संकुल, गारखेडा परिसर, औरंगाबाद येथे सांय.६.०० वाजता संपन्न होणार आहे. सभेत खालील विषयावर चर्चा करुन निर्णय घेण्यात येणार आहे. आपल्या जिल्ह्याचे दोन प्रतिनिधी सभेस पाठवावे.

## <u>सभेचे विषय</u>

१) मागील सभेचे इतिवृत्त वाचुन मंजुरी देणे.

२) ऑडीट रिपोर्टला मंजुरी देणे.

३) अहवालास मंजुरी देणे.

४) अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

५) २०१५-१६ चे राज्य स्पर्धेचे वेळापत्रक निश्चित करणे.

६) राष्ट्रीय स्पर्धा आयोजना बाबत चर्चा करणे.

७) अध्यक्षाच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

**सरचिटणीस**
**महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशन**

कोरम अभावी तहकुब झालेली सभा याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. या सभेला कोरमची आवश्यकता राहणार नाही.

# अहवाल

सन २०१४-१५ वर्षाचा अहवाल सादर करतांना विशेष आनंद होत आहे. कारण राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्रातील तलवारबाजपटुंनी उत्कृष्ट कामगिरी करुन महाराष्ट्राचे नाव उज्वल केले आहे. त्या बरोबरच मा.राज्यपाल महोदयांच्या अधिपत्याखाली महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांसाठी क्रीडा महोत्सव (अश्वमेध) स्पर्धेचे आयोजन केले जाते. या स्पर्धांमध्ये पाच मुलभूत खेळांचा व सहावा ऐच्छिक खेळ यजमान विद्यापीठाला समाविष्ट करण्याचे अधिकार असतात. यावेळी डॉ.बा.आं.म.विद्यापीठाने तलवारबाजी खेळाचा समावेश करुन तलवारबाजी खेळाला एका नव्या उंचीवर पोहचविण्याचे काम केले आहे. यासाठी मा.राज्यपाल विद्यासागर राव यांच्यासह ज्यांच्या विशेष प्रयत्नांमुळे हे शक्य झाले असे मा.आ.सतिशभाऊ चव्हाण, मा.कुलगुरु डॉ.बी.ए.चोपडे, व्यवस्थापन परिषदेचे सर्व सन्माननिय सदस्य व १८ व्या क्रीडा महोत्सव आयोजन समितीचे सर्व पदाधिकाऱ्यांचे विशेष आभार व्यक्त करतो.

महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशनच्या अधिपत्याखाली खालील ठिकाणी राज्य स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. ९ वी कुमार कुमारी राज्य अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन दिनांक २७ ते २९ जून २०१४ च्या दरम्यान औरंगाबाद जिल्हा फेन्सिंग असोसिएशनचे वतीने विभागीय क्रीडा संकुल, औरंगाबाद येथे यशस्वी रित्या आयोजित करण्यात आली. श्रीमती एम.एच.खंडेलवाल, डॉ.उदय डोंगरे, दिनेश वंजारे, गोकुळ तांदळे, फकीरबा घोडे पाटील तसेच सर्व जिल्हा संघटनेचे पदाधिकारी यांनी यशस्वी रित्या उत्कृष्टपणे आयोजन केले. त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. १६ व्या सबज्युनियर राज्य अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन दि.१८ ते २० जुलै २०१४ दरम्यान वाशिम येथे वाशिम जिल्हा फेन्सिंग असोसिएशन यांच्या वतीने करण्यात आले. अध्यक्ष आर.आर.पवार यांनी व जिल्हा संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेऊन स्पर्धा यशस्वीरित्या आयोजित केल्या. त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. ११ व्या कॅडेट राज्य अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन धुळे येथे दि.३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०१४ चे दरम्यान धुळे जिल्हा फेन्सिंग असोसिएशनच्या वतीने यशस्वी रित्या करण्यात आले. त्याबद्दल जिल्हा संघटनेचे सरचिटणीस कैलास कणखरे, हस्ती पब्लीक स्कुलचे संचालक व सर्व पदाधिकारी यांना धन्यवाद देतो.

२ री युथ राज्य अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन परभणी येथे दिनांक १९ ते २१ जानेवारी २०१५ चे दरम्यान बाहेती मंगल कार्यालय, सेलु, परभणी येथे जिल्हा फेन्सिंग असोसिएशनच्या वतीने यशस्वी रित्या करण्यात आले. जिल्हा अध्यक्ष संजयराव देशमुख, सरचिटणीस डॉ.पांडुरंग रणमाळ, प्रशांत नाईक व सर्व पदाधिकारी यांना धन्यवाद देतो.

२२ वी ज्युनियर राज्य अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन सोलापूर येथे ८ ते १० ऑगस्ट २०१४ चे दरम्यान सोलापूर जिल्हा फेन्सिंग असोसिएशनच्या वतीने उत्कृष्टपणे करण्यात आले. त्याबद्दल सोलापूर

जिल्हा फेन्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष श्री.प्रकाश काशिद, सचिव राजु माने, प्रकाश काटुळे, कट्टीमनी, जिल्हा असोसिएशनचे सर्व पदाधिकारी यांना धन्यवाद देतो. २५ व्या वरिष्ठ गट राज्य अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन पुणे येथे दि.२६ ते २८ डिसेंबर २०१४ चे दरम्यान पुणे जिल्हा फेन्सिंग असोसिएशनच्या वतीने करण्यात आले. स्पर्धा उत्कृष्टपणे आयोजित करण्यात आल्या त्याबद्दल जिल्हाध्यक्ष रवी चौधरी, कार्याध्यक्ष शरद अण्णा चव्हाण, सचिव अविनाश दुधाने, सचिव शेळके, महावीर इंटरनॅशनल स्कुलचे सर्व संचालक व मुख्याध्यापिका सौ.सेन यांच्या सह सर्व शिक्षक व कर्मचारी वृंद व जिल्हा संघटनेचे सर्व पदाधिकारी यांना धन्यवाद देतो.

नाशिक जिल्हा तलवारबाजी संघटनेने ५ व्या मिनी राष्ट्रीय तलवारबाजीचे यशस्वी आयोजन केले. तसेच एक आगळा वेगळा उपक्रम म्हणून २५ वी वरीष्ठ राष्ट्रीय स्पर्धा व २ री युथ राष्ट्रीय स्पर्धेचे विभागीय क्रीडा संकुल नाशिक येथे दि.२५ फेबु. ते ३ मार्च २०१५ दरम्यान यशस्वी आयोजन केले. आत्तापर्यंतची सर्वात भव्यदिव्य अशी स्पर्धा या ठिकाणी संपन्न झाली. यामध्ये गुरुवर्य श्री.अशोक दुधारे यांचा सिंहाचा वाटा राहीला. जिल्हा अध्यक्ष श्री.दत्ता पाटील, सचिव श्री.राजु शिंदे, रमेश मारवाडी, मधुकर देशमुख, भाविक भिडे, दिपक निकम, कुणाल आहिरे, चिन्मय देशपांडे यांच्यासह जिल्हा संघटनेचे सर्व पदाधिकारी यांना धन्यवाद देतो.

शालेय राज्य तलवारबाजी स्पर्धेचे भंडारा येथे यशस्वी आयोजन करण्यात आले त्यासाठी उपसंचालक विजय संतान, जिल्हा क्रीडा अधिकारी सुभाष गांगरेजीवाल, क्रीडा कार्यालयाचे सर्व अधिकारी आदींसह जिल्हा संघटनेचे सचिव सुनिल कुदंजेकर व त्यांच्या सर्व सहकाऱ्याचे मी धन्यवाद देतो.

१४ वर्षाखालील व १९ वर्षाखालील शालेय राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धा दि.५ ते ९ मे २०१५ दरम्यान बालेवाडी, पुणे येथे संपन्न झाल्या. या स्पर्धा पुणे जिल्हा तलवारबाजी संघटनेचे अध्यक्ष रवी चौधरी, सचिव अविनाश दुधाने, सचिन शेळके, वरील राष्ट्रीय खेळाडु सचिन भारद्वाज, संकेत ओस्वाल, रमीज तांबोळी, ऐश्वर्या संचेती यांच्या परिश्रमाने व राज्य संघटनेचे मार्गदर्शक अशोक दुधारे, अध्यक्ष प्रकाश काटुळे यांच्या मार्गदर्शनाने यशस्वीरित्या पार पडल्या या स्पर्धेसाठी क्रीडा आयुक्त श्री.माने, नरेंद्रजी सोपल, श्री.एन.बी.मोरे, श्री.मानिक ठोसरे, श्री.सुहास पाटील, श्री.उदय जोशी, श्री.वाळके, श्री.अनिल चोरमले यांचे विशेष योगदान लाभले आहे. ह्यामुळे मी वरील सर्वांचे आभार व्यक्त करतो.

**<u>विद्यापीठ क्रीडा स्पर्धा :</u>**

विद्यापीठ क्रीडा स्पर्धेमध्ये गेल्या पाच वर्षापासून तलवारबाजी या खेळाचा समावेश करण्यात आला असून तलवारबाजीच्या स्पर्धा नियमितपणे विद्यापीठात नियमितपणे सुरु झालेल्या आहेत. पटियाला (पंजाब) येथे झालेल्या विद्यापीठीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्रातील १० विद्यापीठ सहभागी झाले होते. यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने फॉईल सांघिक प्रकारात कांस्य पदक पटकाविले. यांत स्वप्निल तांगडे, तुषार आहेर, अजय त्रिभवुन, सयाजी नवले तसेच शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरने फॉईल प्रकारात कांस्य पदक संपादन केले. या संघात तेजल पाटील, स्नेहल लाड, अश्विनी कोळी आदी खेळाडुंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत पदक पटकाविले.

**<u>जागतिक तलवारबाजी स्पर्धा :</u>**

रशिया येथे झालेल्या जागतिक तलवारबाजी स्पर्धेत राष्ट्रीय पदक विजेता अजिंक्य दुधारे व स्वप्निल तांगडे हे दोन भारतीय संघाचे प्रतिनिधित्व केले होते. जागतिक तलवारबाजी स्पर्धेत पहिल्यांदाच महाराष्ट्रातून एकाहुन अधिक असे दोन खेळाडु पात्र होऊन सहभागी झाले आहेत. अजिंक्य दुधारे व स्वप्निल तांगडे या दोन्ही खेळाडुंचे हार्दिक अभिनंदन.

**<u>३५ वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, केरळ :</u>**

३५ वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा केरळ येथे संपन्न झाली. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये तलवारबाजी संघास यापुर्वी एखाद्या पदकावरच समाधान मानावे लागत होते. परंतु या वेळेस सर्व खेळाडुंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन दोन कांस्य व एक रौप्य पदक संपादन केले आहे.

इप्पी मुलांच्या संघाने कांस्य पदक संपादन केले. या संघास अजिंक्य दुधारे, सागर मगरे, दिनेश वंजारे, अक्षय देशमुख आदींचा समावेश होता तर थोंबा सिंगने फॉईल प्रकारात वैयक्तिक रौप्य पदक पटकावले. सेबर मुलींच्या संघाने कांस्य पदक पटकावले. या संघात अस्मिता दुधारे, अर्चना लाड, निशा पुजारी, स्नेहल विधाते आदींचा समावेश होता. मी या सर्व खेळाडुंचे हार्दिक अभिनंदन करतो.

**<u>N.I.S. प्रशिक्षण शिबीर :</u>**

N.S.N.I.S.पटीयाळा, पंजाब येथे एक वर्षाचा डिप्लोमा कोर्स यशस्वीरित्या पुर्ण केल्याबद्दल राहुल मांडवकर याचे हार्दिक अभिनंदन !

औरंगाबाद साई केंद्राचे सहाय्यक संचालक मा.श्री.विरेंद्र भांडारकर यांच्या प्रयत्नामुळे औरंगाबाद साईमध्ये तलवारबाजी खेळाचा ६ आठवडे एन.आय.एस.अभ्यासक्रम सुरु केल्याबद्दल त्यांचे हार्दिक आभार मानतो व त्यांच्याच प्रयत्नांमुळे तलवारबाजी खेळाचा औरंगाबाद साईमध्ये समावेश होणार आहे त्यासाठी त्यांना शुभेच्छा देऊन त्यांचे पुनश्च आभार व्यक्त करतो.

**<u>प्रशिक्षण शिबीर :</u>**

महाराष्ट्र मिनी संघाचे प्रशिक्षण नाशिक येथे होऊन संघ राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाला. सबज्युनियर व कॅडेट संघाचे प्रशिक्षण शिबीर नाशिक येथे आयोजित करण्यात आले व संघ भिलाई, छत्तीसगड येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे खेळाडु सहभागी झाले. ज्युनियर संघाचे प्रशिक्षण शिबीर नाशिक येथे लावण्यात आले होते. ग्वालियर (मध्यप्रदेश) येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय

स्पर्धेत महाराष्ट्राचा संघ सहभागी झाला होता. वरिष्ठ गटाची राष्ट्रीय स्पर्धा नाशिक येथे संपन्न झाली. महाराष्ट्राचा संघ नाशिक येथे प्रशिक्षण घेऊन राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाला. युथ संघाचे प्रशिक्षण शिबीर नाशिक येथे होऊन नाशिक (महाराष्ट्र) येथे राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाला.

**खेळाडु आरक्षण :**

महाराष्ट्र शासनाने नोकर भरती खेळाडुंसाठी आरक्षण ठेवले आहे. त्याचा फायदा महाराष्ट्रातील अनेक फेन्सिंगच्या खेळाडुंना मिळाला व ते सध्या शासकीय सेवेत कार्यरत आहेत. या निर्णयाबद्दल महाराष्ट्र शासनाचे व क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचे आभार.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, क्रीडा मंत्री विनोद तावडे साहेब, शिक्षण व क्रीडा सचिव सहारिया, सतिश जोंधळे साहेब, श्री.नरेंद्र सोपल साहेब, संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, उपसंचालक सर्वश्री माणिक ठोसरे साहेब, आनंद व्यंकेश्वर साहेब, जनक टेकाळे साहेब, मोटे साहेब, चंद्रकांत कांबळे साहेब, देशमुख मॅडम, आधाने साहेब, रवि नाईक साहेब, संजय सबनीस साहेब, चंदीगड पोलीस आयुक्त जगदिश मित्तल तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी सुधीर मोरे, बोबडे साहेब, अजय पवार साहेब, मोराळे मॅडम, राजपुत साहेब, महादवाड साहेब, गोकुळ तांदळे, श्री.अरुण पाटील साहेब, तसेच महाराष्ट्राचे सर्व जिल्हा क्रीडाधिकारी, क्रीडा कार्यालयाचे प्रतिनिधी यांनी वेळोवेळी फेन्सिंगच्या खेळाडुंसाठी योग्य ते निर्णय घेतले त्याबद्दल त्यांचे आभार.

महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष मा.अजित पवार, उपाध्यक्ष सुरेश कलमाडी, सतिश प्रधान, शामराव आष्टेकर, सरचिटणीस बाळासाहेब लांडगे, भारतीय ऑलिम्पिक महासंघाचे सदस्य श्री.नामदेव शिरगावकर, श्री.प्रल्हाद सावंत, श्री.प्रताप जाधव, महेंद्र चेंबुरकर, महशे लोहार, श्री.भोसले यांच्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल आभार. महाराष्ट्र सॉफ्टबॉल असो.चे सरचिटणीस डॉ.प्रदिप तळवेलकर, महाराष्ट्र बेसबॉल असो.चे सरचिटणीस राजेंद्र इखलकर, महाराष्ट्र कॉर्फ बॉल असो.चे सरचिटणीस प्रविण मानवटकर, महाराष्ट्र नेटबॉल असो.चे सरचिटणीस संजय पाटील, महाराष्ट्र आटयापाटया असो.चे अध्यक्ष दिपक कविश्वर, महाराष्ट्र सायकल पोलो असो.चे सरचिटणीस गजानन बुरुडे, महाराष्ट्र वुडबॉल असो.चे सरचिटणीस विकास टोणे, महाराष्ट्र थ्रो-बॉल असो.चे सरचिटणीस मुरलीधर मुरारकर, कोषाध्यक्ष दिनेश अहिरे, महाराष्ट्र टेनिस व्हॉलबॉल असोसिएशनचे सरचिटणीस व्यंकटेश वंगवाड, संयोजन समिती सचिव आनंद खरे, महाराष्ट्र रस्सीखेच असो.चे सरचिटणीस जे.यु.गोपीले, महाराष्ट्र शटल कॉक असो.चे अशोक पवार, महाराष्ट्र किक बॉल असो.चे प्रशांत नाईक, सरचिटणीस, महाराष्ट्र खो-खो असो.चे श्री.चंद्रजित जाधव, श्री.मंदार देशमुख, महाराष्ट्र कबड्डी असो.चे श्री.बाबा इंगळे, महाराष्ट्र ॲथलेटीक्स असो.चे प्रल्हाद सावंत व इतर सर्व संघटनांचे पदाधिकारी यांनी वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे हार्दिक आभार. राज्य संघटनेचे मार्गदर्शक सर्वश्री अशोक दुधारे, अध्यक्ष प्रकाश काटुळे, कार्याध्यक्ष प्रमोद वानखेडे, उपाध्यक्ष मा.आ.चंद्रकांत सोनवणे, पद्माकर जगदाळे, शेषनारायण लोढे, प्रा.सुधिर कहाते, कोषाध्यक्ष राजकुमार सोमवंशी, सहसचिव डॉ.पांडुरंग रणमाळ, अविनाश दुधाने, विलास वाघ, शोएब मोहम्मद, सदस्य डॉ.अभिजीत मोरे, राजु शिंदे, दिलीप घोडके, राहुल वाघमारे, आर.आर.पवार, विनय जाधव, केदार ढवळे, संजय इसाळकर, श्रीकांत देशमुख, राहुल वाघमारे (नांदेड), सुधीर जमधाडे, अनिल रावळे व डॉ.अर्जुन मोरे तसेच सर्व जिल्हा

संघटनेचे अध्यक्ष, सरचिटणीस व पदाधिकारी यांनी वेळोवेळी सहकार्य व मार्गदर्शक केले त्याबद्दल त्यांचे आभार मानुन अहवाल संपवतो. तसेच महाराष्ट्रातील सर्व वर्तमानपत्र प्रामुख्याने लोकमत, दिव्य मराठी, सकाळ, लोकपत्र, गावकरी, देशदूत, लोकसत्ता, टाईम्स ऑफ इंडिया, महाराष्ट्र टाईम्स, पुण्य नगरी, देशोन्नती व इलेक्ट्रॉनिक्स मिडीया यांचे संपादक प्रतिनिधी यांनी वेळोवेळी सहकार्य व मार्गदर्शन केले त्याबद्दल त्यांचे आभार.

राज्य संघटनेला वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य करणारे मा.आ.सतिशभाऊ चव्हाण, महापौर त्रिंबक तुपे, मा.आ.संजयभाऊ शिरसाठ, एस.पी.जवळकर, औरंगाबाद म.न.पा.सभागृह नेता राजेंद्रभाऊ जंजाळ, उच्च शिक्षण संचालक मा.श्री.धनराज माने, एम.जी.एम.संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.प्रविण सुर्यवंशी, मा.संपादक चक्रधर दळवी, श्रीमती निलिमाताई पवार, अरविंद कारे, शरद कोशिरे, क.का.वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, उपाध्यक्ष काशिनाथदादा टर्ले, विश्‍वस्थ चांगदेवदादा होळकर, डॉ.कैलास कमोद, नाना महाले, आनंद खरे, नितीन हिंगमिरे, संजयराव देशमुख, राजेंद्र कुलथे, गोविंदराव देशमुख, दत्ता पाटील, अण्णासाहेब पाटील, श्री.नरेंद्र छाजेड, राधेश्याम मुंदडा, साहेबराव पाटील, श्री.रविंद्र मोरे, नंदकिशोर खैरनार, अशपाक शेख, उदय खरे, श्री.खांडवे, श्री.आव्हाड, रमेश मारवाडी, मधुकर देशमुख, श्री.तळाजिया, आकाश छाजेड, तसेच फेन्सिंग असो.ऑफ इंडिया अध्यक्ष डी.डी.बोरो, सरचिटणीस संजय प्रधान, क्रीडा व युवा संचालनालय कार्यालयाचे श्री.मोरे, उदय पवार, श्री.देशपांडे, विजय पाटील, राजेश क्षत्रिय, रुपल गुप्ता, रवि नाईक, धनंजयराव महाडीक या सर्वांच्या सहकार्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. तसेच राज्य संघटनेला वेळोवेळी मदत करणारे शिवछत्रपती पुरस्कार विजेते ॲड.आयफाज कुरेसी, लक्ष्मी चौरे, वैशाली नागुलवार, निलेश गुरुळे, श्रध्दा वायदंडे, योगेश पटेल, श्‍वेता चंदालिया, ज्ञानेश्‍वर निगळ, श्रुती वायदंडे, शिल्पा नेने, तनुजा पटेल, रेफ्री बोर्ड चेअरमन विनय जाधव, राजु शिंदे, प्रशांत जगताप, सुरज येवतीकर, निर्मला चौधरी, कैलास लवांड यांच्यासह सर्व आजी-माजी खेळाडु, क्रीडा शिक्षक, क्रीडा प्रेमींना धन्यवाद देतो.

तसेच पत्रकार शिवाजी गोरे, राजेश शर्मा, जयंत कुलकर्णी, सुधिर भालेराव, नितीन गायकवाड, आदित्य वाघमारे, तुषार वखरे, विजय साठे, दिक्षित साहेब, भालेराव साहेब, नाना खैरनार, अविनाश पाटील, नरेश बोरसे, अविनाश ओंबासे, रविंद्र एरंडे, धनंजय रिसोडकर, आदित्य घोरपडे, प्रल्हाद सावंत, श्री.मदने, श्री.वाघमारे, श्री.माधव शेजुळ, श्री.मंडलिक, श्री.नितीन भालेराव, महेश पठाडे साहेब, श्री.सुर्यवंशी, श्री.शेळके, आनंद खरे, अविनाश खैरनार, मैदान विजेताचे प्रशांत नवगिरे, विश्‍व मैदानाचे मिलिंद येवले, सर्व इलेक्ट्रॉनिक्स मिडिया प्रिंटस् मिडिया यांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद !

धन्यवाद !

**डॉ.उदय डोंगरे**
**सरचिटणीस**
**महाराष्ट्र स्टेट फेन्सिंग असोसिएशन**

# <u>अंदाजपत्रक</u>

## सन २०१५-२०१६

| **खर्च** | | **नावे** | |
|---|---|---|---|
| स्पर्धा आयोजन खर्च | ११,००,०००/- | शासकीय अनुदान | १०,००,०००/- |
| प्रशिक्षण शिबीर खर्च | २,००,०००/- | वर्गणी व प्रवेश फी व संलग्नता शुल्क | ५,००,०००/- |
| प्रवास खर्च | २,००,०००/- | देणगी | १२,००,०००/- |
| क्रीडा साहित्य | १०,००,०००/- | | |
| स्टेशनरी व पोस्टेज | १,००,०००/- | | |
| पुरस्कार वितरण | १,००,०००/- | | |
| **एकुण** | **२७,००,०००/-** | | **२७,००,०००/-** |